# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १६३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## बुधवार, दि.२५ ऑक्टोबर, २०२३ सकाळी ११:०० वा.



NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १६३ वी बैठक बुधवार, दि.१८ ऑक्टोबर, २०२३ रोजीची तहकूब केलेली बैठक **बुधवार, दि.२५ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी ११:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस सदस्य हे उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| २) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ५) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १७) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. मलिक सगाजी रोकडे<br>प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि.१५ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६२ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेणे. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.२४ जुलै, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६० व्या बैठकीतील विषय क्र.३ वर झालेल्या ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली आहे.<br>दुरुस्त ठराव<br>मुलींच्या वसतिगृहासाठी Generator सेट खरेदी करण्याऐवजी सामाजिकशास्त्रे संकुल येथे असलेला Generator वर सामाजिकशास्त्रे संकुल, मुलींचे वसतिगृह, आरोग्य विभाग व ॲग्रो-टूरीझम हे विभाग / संकुले जोडण्यात येवून Generator चे देखभाल व दुरुस्ती अभियांत्रिकी विभागाकडून करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | अभियांत्रिकी विभाग व वसतिगृह विभाग |
| | दि.१५ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६२ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला. | |
| | १) पान क्र. १४ व विषय क्र.१० मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | आस्थापना विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | महाराष्ट्र शासन वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. अकाभ-२०२२/प्र.क्र. ०७/सेवा-६, दि. ०७ ऑगस्ट, २०२३ अन्वये शासकीय वाहन चालकांना देण्यात येणाऱ्या अतिकालिक भत्त्यामध्ये वाढ केल्याने, त्याच धर्तीवर प्रस्तुत विद्यापीठातील नियमित कार्यरत वाहन चालकांनी ९ तासांपेक्षा जास्त काम केल्यास सदर शासन निर्णयातील शर्तीच्या अधिन राहून प्रति तास रु.१००/- याप्रमाणे अतिकालिक भत्ता देण्यास तसेच सदर अतिकालिक भत्ता वाढ ही शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून नियमित व कंत्राटी वाहनचालक यांना लागू राहील, यांस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | महाराष्ट्र शासन वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. अकाभ-२०२२/प्र.क्र. ०७/सेवा-६, दि. ०७ ऑगस्ट, २०२३ अन्वये शासकीय वाहन चालकांना देण्यात येणाऱ्या अतिकालिक भत्त्यामध्ये वाढ केल्याने, त्याच धर्तीवर प्रस्तुत विद्यापीठातील नियमित कार्यरत वाहन चालकांनी ९ तासांपेक्षा जास्त काम केल्यास सदर शासन निर्णयातील शर्तीच्या अधिन राहून प्रति तास रु.१००/- याप्रमाणे अतिकालिक भत्ता देण्यास तसेच सदर अतिकालिक भत्ता वाढ ही शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून नियमित व कंत्राटी वाहनचालक यांना लागू राहील, यांस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच कार्यरत कंत्राटी वाहन चालकांनी ९ तासांपेक्षा जास्त काम केल्यास त्यांना प्रति तास रु.१००/- याप्रमाणे अतिकालिक भत्ता देण्यास व त्या महिन्याच्या पगाराच्या ९०% इतकी जास्तीत जास्त रक्कम अतिकालिक भत्ता (ओव्हरटाइम) स्वरुपात द्यावी. त्यापेक्षा जास्त तास अतिकालिक भत्ता (ओव्हरटाइम) होत असल्यास त्यांना Compensatory off देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. | |

| | | |
|---|---|---|
| | २) पान क्र. १८ व विषय क्र.१२ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | संशोधन विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | संशोधक विद्यार्थ्यांनी पीएच. डी. अभ्यासक्रमाचे शुल्क व सहामाही प्रगती अहवाल विलंबाने भरल्यास / सादर केल्यास व्यवस्थापन परिषदेने दि.१९/०९/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र.६ अन्वये निश्चित केलेल्या दंडाच्या रक्कमेप्रमाणे सहा महिन्याकरीता रु.५००/- व एक वर्षाकरीता रु.१,०००/- दंड आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच सद्य:स्थितीत जे विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत त्या विद्यार्थ्यांना सदरचा नियम लागू राहील असे सर्वानुमते ठरले.<br>त्याचप्रमाणे सध्या संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्याकडून रु.५००/- किंवा १,०००/- यापेक्षा जादा दंडाची रक्कम घेतली असल्यास त्यांची पुढील रक्कम विद्यार्थ्यांच्या फी मध्ये वर्ग करुन घेण्यात यावी असेही ठरले. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | संशोधक विद्यार्थ्यांनी पीएच. डी. अभ्यासक्रमाचे शुल्क व सहामाही प्रगती अहवाल विलंबाने भरल्यास / सादर केल्यास व्यवस्थापन परिषदेने दि.१९/०९/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र.६ अन्वये निश्चित केलेल्या दंडाच्या रक्कमेप्रमाणे सहा महिन्याकरीता रु.५००/- व एक वर्षाकरीता रु.१,०००/- दंड आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदरची अंमलबजावणी दि.२५/१०/२०२३ पासून करण्यात यावी. | |
| | ३) पान क्र. ४५ व विषय क्र.३१ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | प्रश्नपत्रिकांचे डी.टी.पी., टाईप सेटिंग, प्रुफ रिडींग करुन वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका ऑनलाईन ई- मोड प्रणालिद्वारे गोपनीय पध्दतीने परीक्षाकेंद्रावर पाठविण्याच्या कामासाठी SHPC Technologies Pvt. Ltd, Mumbai या गोपनीय फर्म समवेत करण्यात आलेल्या करारपत्रातील मुद्दा क्रमांक ५ नुसार ऑक्टोबर, २०२३ या एका परीक्षेसाठी मुदतवाढ देण्याचे सर्वानुमते ठरले. | |

| | | |
|---|---|---|
| | ४) पान क्र. ५२ व विषय क्र.३७ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | संलग्नता विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | मा. अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत एकदाही नॅक मूल्यांकन/ पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेतलेले नाही अशा महाविद्यालयांची संलग्नता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० मधील तरतुदीनुसार का काढून घेण्यात येऊ नये? याबाबतची कारणे दाखवा नोटीस पाठविण्यास मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतुदीनुसार विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता देवून केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | मा. अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत एकदाही नॅक मूल्यांकन/ पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेतलेले नाही अशा महाविद्यालयांची संलग्नता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२० मधील तरतुदीनुसार का काढून घेण्यात येऊ नये? याबाबतची कारणे दाखवा नोटीस पाठविण्यास मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतुदीनुसार विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता देवून केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | दि.०४ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६१ व्या तातडीच्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.०४ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६१ व्या तातडीच्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले On Screen Evaluation या कामाकरीता Printing of Question paper /online examination expenses या अंदाजपत्रकिय शिर्षकामधून रु.९०,००,०००/- या अंदाजपत्रकिय शिर्षकाधून On Screen Evaluation या अंदाजपत्रकिय शिर्षकामध्ये वर्ग करून पुर्ननियोजन (Re-appropriation) करून घेण्याची बाब विचारार्थ.** | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

टिपणी: परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून On Screen Evaluation साठी सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता अंदाजपत्रिकीय तरतूद करतेवेळी On Screen Evaluation या अंदाजपत्रिकीय शिर्षकामध्ये रु.७५,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली होती. ०१ एप्रिल २०२३ पासून आज अखरेपर्यत सदर शिर्षकामधून रु.४५,६४,१००/- इतकी रक्कम खर्ची पडली असून रु.२९,३५,९००/- इतकी रक्कम शिल्लक आहे. तरी परीक्षेच्या स्कॅनिंगच्या कामासाठी अंदाजे रु.९०,००,०००/- इतकी रक्कम आवश्यता असून सदरची रक्कम Printing of Question paper /online examination expenses या अंदाजपत्रकिय शिर्षकामधून रु.९०,००,०००/- या अंदाजपत्रकिय शिर्षकाधून On Screen Evaluation या अंदाजपत्रकिय शिर्षकामध्ये वर्ग करून पुर्ननियोजन (Re-appropriation) करणे गरजेचे आहे. तरी ज्या अंदाजपत्रकिय मधून पुर्ननियोजन करावयाचे आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

(अ)

| Budget Head | On Screen Evaluation |
|---|---|
| ProScreen | 75,00,000/- |
| Provisionre | 45,64,100/- |
| Balance | 29,35,900/- |

(ब)

| Budget Head | Printing of Question paper /online examination expenses |
|---|---|
| Provision | 3.75,00,000/- |
| Expenditure | 47,36,874/- |
| Balance | 3,27,63,126/- |

सबब, वरीलप्रमाणे दर्शवलेल्या (ब) मधील एकूण रु.९०,००,०००/- इतकी रक्कम (अ) या अंदाजपत्रकामध्ये वर्ग करुन On Screen Evaluation या अंदाजपत्रकीय शिर्षकाचे पुर्ननियोजन (Re-appropriationi) करुन घेण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले On Screen Evaluation या कामाकरीता Printing of Question paper /online examination expenses या अंदाजपत्रकीय शिर्षकामधून रु.९०,००,०००/- On Screen Evaluation या अंदाजपत्रकीय शिर्षकामध्ये वर्ग करुन पुर्ननियोजन (Re-appropriation) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले** Vehicle Expenses for Exam Department **या कामाकरीता** Data Centre rent **या अंदाजपत्रकीय शिर्षकामधून रु.१२,००,०००/- या अंदाजपत्रकीय शिर्षकाधून** Vehicle Expenses for Exam Department **या अंदाजपत्रकीय शिर्षकामध्ये वर्ग करून पुर्ननियोजन** (Re-appropriation) **करून घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून Vehicle Expenses for Exam Department साठी सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता अंदाजपत्रिकीय तरतूद करतेवेळी Vehicle Expenses for Exam Department या अंदाजपत्रिकीय शिर्षकामध्ये रु.५,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली होती. ०१ एप्रिल २०२३ पासून आज अखरेपर्यत सदर शिर्षकामधून रु.४,२०,२८८/- इतकी रक्कम खर्ची पडली असून रु.७९,७१२/- इतकी रक्कम शिल्लक आहे. तरी परीक्षेच्या कामासाठी भरारी पथकासाठी भाडोत्री वाहने घेण्यासाठी अंदाजे रु.१२,००,०००/- इतकी रक्कम आवश्यता असून सदरची रक्कम Data Centre rent या अंदाजपत्रकिय शिर्षकामधून रु.१२,००,०००/- या अंदाजपत्रकिय शिर्षकाधून Vehicle Expenses for Exam Department या अंदाजपत्रकिय शिर्षकामध्ये वर्ग करून पुर्ननियोजन (Re-appropriation) करणे गरजेचे आहे. तरी ज्या अंदाजपत्रकिय मधून पुर्ननियोजन (Re-appropriation) करावयाचे आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे.<br>(अ)<br>Budget Head — Vehicle Expenses for Exam Department<br>Provision — 5,00,000/-<br>Expenditure — 4,20,288/-<br>Balance — 79,712/-<br>(ब)<br>Budget Head — Data Centre rent<br>P79,712/- — 12,00,000/-<br>Expenditure — 2,00,524/-<br>BBudget — 12,99,476/-<br>सबब, वरीलप्रमाणे दर्शवलेल्या (ब) मधील एकूण रु.१२,००,०००/- इतकी रक्कम (अ) या अंदाजपत्रकामध्ये वर्ग करुन Vehicle Expenses for Exam Department या अंदाजपत्रकीय शिर्षकाचे पुर्ननियोजन (Re-appropriation) करुन घेण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले** Vehicle Expenses for Exam Department **या कामाकरीता** Data Centre rent **या अंदाजपत्रकीय शिर्षकामधून रु.१२,००,०००/-** Vehicle Expenses for Exam Department **या अंदाजपत्रकीय शिर्षकामध्ये वर्ग करून पुर्ननियोजन** (Re-appropriation) **करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

(अ)

| Budget Head | Vehicle Expenses for Exam Department |
|---|---|
| Provision | 5,00,000/- |
| Expenditure | 4,20,288/- |
| Balance | 79,712/- |

(ब)

| Budget Head | Data Centre rent |
|---|---|
| P79,712/- | 12,00,000/- |
| Expenditure | 2,00,524/- |
| BBudget | 12,99,476/- |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **कंत्राटी शिक्षकांना वैद्यकीय विमा योजना लागू करण्यात यावी अशी अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या सर्वंकष विचारार्थ.**<br>टिपणी: दि. २८ जुलै, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. २८ अन्वये श्री. सुदर्शन मसु यादव यांनी खालील ठराव मांडण्यासाठी सूचना पाठविली व त्यास श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी अनुमोदन दिले. त्यानुसार सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.<br>"विद्यापीठ परिसरातील विविध संकुलांमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी शिक्षकांना वैद्यकीय विमा योजना लागू करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."<br>याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, विद्यापीठ परिसर संकुलात रसायनशास्त्र संकुल, पदार्थविज्ञान संकुल, भूशास्त्र संकुल, संगणकशास्त्र संकुल आणि सामाजिकशास्त्रे संकुल अशी एकूण ०५ अनुदानित संकुले असून, त्यात एकूण १७ शासनमान्य अधिविभाग कार्यरत आहेत. तर वाणिज्य व व्यवस्थापन संकुल, भाषा व वाङ्मय संकुल, तंत्रज्ञान संकुल, आरोग्य विज्ञान संकुल, ललितकला व कला संकुल, जैवविज्ञान संकुल या ०६ संकुलातील वाणिज्य व विज्ञान संकुल वगळता, इतर ०५ संकुले विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये त्यात अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. सध्या एकूण ११ संकुले सुरु असून, त्यात ९६ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक कार्यरत आहेत.<br>सदरची पदे दरवर्षी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०३ अन्वये Walk-in-Interview व्दारे स्थानिक निवड समितीने शिफारस केल्यानुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांसाठी संबंधित उमेदवारांच्या नियुक्त्या केल्या जातात. सदर कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांना सेट/नेट/पीएच.डी. ही शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारास माहे एकत्रित वेतन रु. ३०,०००/- तर सेट/नेट/पीएच.डी. ही शैक्षणिक अर्हता धारण न करणा-या उमेदवारास रु. २५,०००/- विद्यापीठाच्या सामान्य निधीतून (University General Funds) आदा करण्यात येते. त्यांच्या वेतनासंदर्भात शासनाकडून व तत्सम कोणत्याही एजन्सीकडून अनुदान वा देणगी मिळत नाही. सर्व खर्च विद्यापीठ आपल्या निधीतून दरवर्षी करतो.<br>संबंधित उमेदवारांना पारित करण्यात येणा-या नियुक्ती आदेशात खालीलप्रमाणे अटी नमूद करण्यात येतात.<br>Your appointment is purely on temporary basis commencing from the date of joining til the end of second term i.e. 30/04/2024.<br>Your service of the University is liable to be terminated or discontinued without assigning any reason. You shall not leave or discontinue the service of University without giving one month's prior notice in writing or one month's remuneration in lieu thereof.<br>You will be not eligible for any another type of leave except casual leave. Hon'ble Vice Chancellor may however in her/his sole discretion may sanction other type of leave as a special case.<br>You will have to sign the requisite contract as well as an undertaking in the prescribed formats on stamp paper worth Rs. 100/- each at the time of joining the duties.<br>नियुक्ती आदेशासमवेत Contract मध्ये शेवटच्या परंतूकान्वयात खालीलप्रमाणे नमूद आहे.<br>We hereby further agree that the contract of service is purely on contract temporary basis for the period conmmencing from date of joining the duties and ending by the dt. 30/04/2024. | आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| | Undertaking मध्ये शेवटच्या परंतूकान्वयातील दुस-या ओळीत खालील तरतूद आहे.<br>I shall not make any claim for absorption/ regularization/ permanency in the service of the P.A.H. Solapur University, Solapur. Later on.<br>विद्यापीठ परिसर संकुलात कार्यरत असलेल्या शिक्षकांना लागू असलेले परिनियम पृष्ठ क्र. २८ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.<br>**(7)(b): Casual Leave:**<br>A teacher appointed on temporary basis will be entiled to casual leave as per rules prescribed under statute 272(B)(a).<br>निव्वळ तात्पुरत्या पदावर दरवर्षी Walk-in-Interview व्दारे नियुक्त करण्यात येणा-या शिक्षकांना वैद्यकीय विमा/Group Insurance मध्ये समावेश केले जाते काय? याबाबत दि.१०/१०/२०२३ रोजी १) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व ४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या अकृषी विद्यापीठामधील अधिकारी/कर्मचा-यांना भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधून विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, विद्यापीठातील नियमित कायम आस्थापनेवरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना Group Insurance मध्ये समावेश केला जातो. दरवर्षी नियुक्त करण्यात येणा-या कंत्राटी शिक्षकांचा समावेश केला जात नाही असे सांगितले.<br>भारताचे राजपत्र दि.१८ मे, २०१० समवेत भारतीय आयुर्विमा महामंडळ (LIC) च्या Group Gratuity Scheme अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक तत्वात पृष्ठ क्र. ४ वर खालील मुद्दे नमूद करण्यात आले आहेत.<br>1) Name of the employee<br>2) Date of Birth and Date of joining in the service<br>3) Salary (Basic + D.A.)<br>4) Normal retirement age for the employees<br>5) Gratuity benefits applicable to the employees.<br>उपरोक्त नमूद केलेले मुद्दे हे कायम आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांशी निगडीत आहेत. निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात एका वर्षासाठी कार्यरत असलेल्या कंत्राटी शिक्षकांना सदर मुद्दे लागू होत नाहीत. त्यामुळे नियमित शिक्षकांप्रमाणे वैद्यकीय विमा, Mediclaim, Group Insurance लागू करता येत नाही. शिवाय विविध संकुलात कार्यरत असलेले कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक इतर ठिकाणी सेवेची चांगली संधी आल्यास सदर पदाचा तात्काळ राजीनामा देऊन जातात. अशा कंत्राटी शिक्षकांची किमान जवळ-जवळ १०% इतके प्रमाण आहे.<br>सबब, तथापि, कंत्राटी शिक्षकांना वैद्यकीय विमा योजना लागू करण्यात यावी अशी अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या सर्वंकष विचारार्थ. | |
| ठराव: | **सदर प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. मात्र आर्थिक भारासह इतर परिपूर्ण माहिती घेऊन वित्त व लेखा समितीच्या शिफारशींसह पुन:श्च सादर करावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापन दिनी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्काराबाबतची नियमावली सुधारित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीकरिता अध्यक्षांचे नामनिर्देशन होऊन मिळण्याची बाब विचारार्थ.** | कुलसचिव कार्यालय |

टिपणी: दरवर्षी प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दि.०१ ऑगस्ट रोजी विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सदरील पुरस्करामध्ये जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट संस्था, उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य, उत्कृष्ट शिक्षक (महाविद्यालय व विद्यापीठ) आणि उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी (महाविद्यालय व विद्यापीठ) या पुरस्कारांचा समावेश होतो.

दि.२४ जुलै, २०२३ रोजी आयोजित व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ०७ (०९) प्रमाणे वर्धापन दिन विविध पुरस्काराबाबतची नियमावली सुधारित करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती.

| १) | **प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे** | **अध्यक्ष** |
|---|---|---|
| २) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य |
| ३) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य |
| ४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य |
| ५) | योगिनी घारे | सदस्य सचिव |

सदरील समितीवर कै. डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे अध्यक्ष म्हणून नामनिर्देशन करण्यात आले होते. तथापि, कै. डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे दि.१५ ऑक्टोबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले आहे.

सबब, वर्धापन दिन विविध पुरस्काराबाबतची नियमावली सुधारित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीकरिता अध्यक्षाचे नामनिर्देशन होऊन मिळण्याची बाब विचारार्थ.

| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापन दिनी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्काराबाबतची नियमावली सुधारित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीकरिता अध्यक्ष कै. डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांच्याऐवजी प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |
|---|---|---|

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **प्रस्तृत विद्यापीठातील LAN च्या AMC व FMS साठी ५ वर्षासाठी (०१/०८/२०२३ ते ३१/०७/२०२८) होणाऱ्या रु.४४,५७,०८१/- खर्चास व BSNL, सोलापूरला Work Order देण्याची बाब पुनश्च: विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तृत विद्यापीठातील LAN व इंटरनेटच्या AMC व FMS चे काम NMEICT प्रकल्पांतर्गत BSNL मार्फत सुरु आहे. सदर AMC चा कालावधी दि.०५/०१/२०२२ रोजी संपलेला आहे. त्यासंदर्भात BSNL कडून दि.०८/०२/२०२३ रोजी आलेल्या ई-मेल नुसार प्रस्तृत विद्यापीठ AMC चे नूतनीकरण करण्यास इच्छुक असल्याबाबतचे BSNL ऑफिसला पत्राने कळवण्यात आले होते. BSNL कडून दि.०३/०८/२०२३ रोजी AMC व FMS साठी होणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. हा प्रस्ताव ५ वर्षासाठी म्हणजेच ०१/०८/२०२३ ते ३१/०७/२०२८ या कालावधीसाठी आहे. सदरचा प्रस्ताव हा सद्यस्थितीत विद्यापीठ परिसरात कार्यरत असलेल्या इंटरनेट सुविधेसाठी आहे.<br>सदर LAN च्या AMC व FMS साठी ५ वर्षासाठी (०१/०८/२०२३ ते ३१/०७/२०२८) होणाऱ्या रु.४४,५७,०८१/- खर्चास व BSNL, सोलापूरला Work Order देण्याच्या मान्यतेसाठी विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५/०९/२०२३ च्या बैठकीमध्ये सादर केला होता (विषय क्र.४३). सदरचा विषय सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत सादर करावा असे सर्वानुमते ठरले.<br>त्यानुसार विषयाची सविस्तरपणे तयार केलेली माहिती सोबत जोडली आहे.<br>सबब, प्रस्तृत विद्यापीठातील LAN च्या AMC व FMS साठी ५ वर्षासाठी (०१/०८/२०२३ ते ३१/०७/२०२८) होणाऱ्या रु.४४,५७,०८१/- खर्चास व BSNL, सोलापूरला Work Order देण्याची बाब पुनश्च: विचारार्थ. | संगणकशास्त्र संकुल |
| ठराव: | **प्रस्तृत विद्यापीठातील LAN च्या AMC व FMS साठी सर्वप्रथम १ वर्षासाठी BSNL, Solapur यांच्याशी वाटाघाटी करुन Work Order देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. मात्र जर १ वर्षाच्या करारास BSNL ने असमर्थता दर्शविल्यास ५ वर्षाकरिता करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**याबाबत सखोल अभ्यास करुन अहवाल देणेसाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**<br>**१) डॉ. आर. एस. मेंते - अध्यक्ष**<br>**२) डॉ. एस. डी. राऊत - सदस्य**<br>**३) डॉ. पी. एम. पवार - सदस्य** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०८ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा / धोरण ठरविण्याबाबत गुंतवणूक उपसमिती गठीत करण्यासाठी समिती सदस्याचे नामनिर्देशनाबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.२७/०३/२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठसाठी दि.०१/०४/२०१२ पासून समान लेखा संहिता (Common Account Code) लागू करण्यात आले आहे.<br>समान लेखा संहिता (Common Account Code) मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार वित्त व लेखा समितीने नामनिर्देशित केलेली गुंतवणूक समिती, गुंतवणूक आराखाडा / धोरण निश्चित करेल व ते आराखाडा / धोरण वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषद यांच्या मान्यतेने अंतिम करुन त्यानुसार वित्त व लेखाधिकारी सदर गुंतवणूक प्रक्रिया मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने पूर्ण करेल. त्यानुसार यापूर्वी दि.०९/१०/२०१२ रोजीची वित्त व लेखा समिती ठराव क्रं. ०३ व दि.१६/१०/२०१२ रोजीची व्यवस्थापन परिषद ठराव क्र.१९ यांच्या मान्यतेन्वये गुंतवणूक आराखाडा / धोरण निश्चित करण्यात आले होते. व त्याप्रमाणे खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी व देणग्या इ. ची गुंतवणूक समान लेखा संहिता कलम १.७२ व विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १०२ (७) नुसार जास्तीत जास्त व्याज देणा-या राष्ट्रीयकृत / शेडयुल्ड बँकेत करण्यात येत होती.<br>मा.कुलगुरु यांनी सदर गुंतवणूक आराखाडा / धोरण सुधारित करणेबाबत निर्देशित केले आहे. सदर धोरण निश्चित करण्यासाठी समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ नुसार वित्त व लेखा समितीच्या बैठकीत गुंतवणूक उपसमिती नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. सदर समिती समान लेखा संहिता २०१२ व महाराष्ट्र विद्यापीठ सार्वजनिक अधिनियम, २०१६ मधील या संदर्भात लागू असलेल्या विविध तरतूदीचे पालन करुन गुंतवणूक आराखाडा / धोरण तयार करेल व वित्त व लेखा समिती आणि व्यवस्थापन परिषदेच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करेल. | वित्त व लेखा विभाग |

| | | |
|---|---|---|
| | सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा / धोरण ठरविण्याबाबत गुंतवणूक उपसमिती गठीत करण्यासाठी समिती सदस्याचे नामनिर्देशन होणेबाबत दि.१०/१०/२०२३ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीमध्ये आयत्या वेळेचा विषय क्र. ३(१) अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे. | |
| | ठराव: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा /धोरण ठरविण्याबाबत पुर्नलोकन करण्यासाठी खालीलप्रमाणे गुंतवणूक उपसमिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली. | |

| अ. क्र. | सदस्यांचे नांव | पदनाम | समिती अध्यक्ष / सदस्य |
|---|---|---|---|
| १ | मा. प्रा. डॉ. प्रकाश महानवर | कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | प्रा. देवानंद चिलवंत | व्यवस्थापन परिषद सदस्य | सदस्य |
| ३ | योगिनी घारे | कुलसचिव | सदस्य |
| ४ | डॉ. जे. के. मुल्ला | अधिसभा सदस्य | सदस्य |
| ५ | सीए श्रेणिक शाह | वित्त व लेखाधिकारी | सदस्य सचिव |

सबब, उपरोक्त दि.१०/१०/२०२३ रोजीच्या ठराव क्र. ०३ (१) प्रमाणे वित्त व लेखा समितीने केलेला ठराव विचारार्थ.

ठराव: **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा / धोरण ठरविण्याबाबत गुंतवणूक उपसमिती गठीत करण्यासाठी समिती सदस्याचे नामनिर्देशनाबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन खालीलप्रमाणे अधिकचे एक सदस्य घेण्याचे सर्वानुमते ठरले.**

| अ. क्र. | सदस्यांचे नांव | पदनाम | समिती अध्यक्ष / सदस्य |
|---|---|---|---|
| १ | मा. प्रा. डॉ. प्रकाश महानवर | कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | योगिनी घारे | कुलसचिव | सदस्य |
| ३ | प्रा. देवानंद चिलवंत | व्यवस्थापन परिषद सदस्य | सदस्य |
| ४ | डॉ. समाधान दिगंबर पवार | व्यवस्थापन परिषद सदस्य | सदस्य |
| ५ | डॉ. जे. के. मुल्ला | अधिसभा सदस्य | सदस्य |
| ६ | सीए श्रेणिक शाह | वित्त व लेखाधिकारी | सदस्य सचिव |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०९ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार, सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवाल संदर्भात दि.१०/१०/२०२३ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याकरिता M/s.SKVM & COMPANY, सोलापूर यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या मान्येतेने नियुक्ती करण्यात आली होती. M/s.SKVM & COMPANY, सोलापूर यांनी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन लेखापरीक्षण अहवाल दिलेला आहे.<br>लेखापरिक्षीत लेखे, लेखापरिक्षण अहवाल दि.१०/१०/२०२३ रोजी वित्त व लेखा समितीच्या बैठकीत विषय क्र. ०२ अन्वये सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होवून खालीलप्रमाणे मान्यतेची शिफारस करण्यात आली.<br>ठराव: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) नुसार सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवाल स्विकारुन व मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, वित्त व लेखा समितीने वरीप्रमाणे केलेली मान्यतेची शिफारस सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवाल स्विकारुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार स्विकारुन मान्यता देण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार, सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवाल संदर्भात दि.१०/१०/२०२३ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली मान्यतेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस शिफारस करण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.१५/०९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४८(८) नुसार डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील डॉ. टी. एन. कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत पुर्नस्थाननिश्चितीबाबत घेतलेल्या निर्णयासंदर्भात गठित त्रिसदस्यीय आढावा समितीने आवश्यक कागदपत्रांचे पडताळणी करून आढावा समितीने विद्यापीठास अहवाल सादर केला असून सदरचा अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.१५/०९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४८(८) नुसार डॉ. टी. एन. कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत पुर्नस्थाननिश्चितीबाबत मा. कुलगुरु महोदयांनी त्रिसदस्यीय आढावा समिती गठित करण्यात आलेली होती. सदर समितीची बैठक दि.१८/०९/२०२३, २१/०९/२०२३ व २२/०९/२०२३ रोजी विद्यापीठामध्ये संपन्न झाली.<br>त्याअनुषंगाने डॉ. टी. एन. कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत पुर्नस्थान-निश्चितीबाबत त्रिसदस्यीय आढावा समितीने दि.२२/०९/२०२३ रोजी अहवाल विद्यापीठास सादर करण्यात आला. सदर अहवालामध्ये डॉ. टी. एन. कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत पुर्नस्थाननिश्चितीबाबत समितीने सादर केलेल्या अहवालामधील अ.क्र. १ ते ७ मुददेनिहाय शिफारस पुढीलप्रमाणे - "डॉ. तानाजी कोळेकर यांची याचिका क्र. ७१८६/२०२२ मा. उच्च न्यायालयात चालू असल्याने, विहित व विधीवत प्रक्रिया विचारात घेवून व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अंतिम निकालाच्या अधीन राहून डॉ. टी. एन. कोळेकर यांची काढून घेतलेली सहयोगी प्राध्यापक मान्यता पुन:स्थापित करणेबाबत सदर समिती विद्यापीठ प्रशासनास शिफारस करीत आहे." असे अहवालामध्ये नमूद केलेले आहे. तसेच गठित त्रिसदस्यीय आढावा समितीने आवश्यक कागदपत्रांचे पडताळणी करून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. (सोबत आढावा समितीचा अहवाल जोडलेला आहे.)<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.१५/०९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४८(८) नुसार डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील डॉ. टी. एन. कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत पुर्नस्थाननिश्चितीबाबत घेतलेल्या निर्णयासंदर्भात गठित त्रिसदस्यीय आढावा समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.१५/०९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४८(८) नुसार डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील डॉ. टी. एन. कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत पुर्नस्थाननिश्चितीबाबत घेतलेल्या निर्णयासंदर्भात गठित त्रिसदस्यीय आढावा समितीने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यापीठास सादर केलेला अहवाल सर्वानुमते स्विकारुन मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **डॉ. सौ. एम. जे. पाटील सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल यांना विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित शिक्षकांना लागू असलेले परिनियम क्र. २७२ [e(B)(a)&(i)] नुसार ३८ दिवसांची विनावेतन असाधारण रजा (Extraordinary Leave) कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. प्रभारी कुलगुरु महोदयांनी मंजूर केल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**<br>टिपणी: प्रथमत: डॉ. सौ. माया जगदीश पाटील, सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल यांनी दि.२५/०७/२०२३ ते २६/०८/२०२३ या कालावधीत Angioplasty झाल्याने एकूण ३३ दिवसांची वैद्यकीय रजा मंजूर करावी, अशी विनंती करुन सोबत रुजू अहवाल Grant Medical Foundation Ruby Hall Clinic, Pune डॉ. जगदीश एस. हिरेमठ या डॉक्टरांच्या स्वाक्षरीचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले होते.<br>तद्नंतर पुन्हा डॉ. सौ. एम. जे. पाटील यांनी Hypertension मुळे दि.२९/०८/२०२३ ते ०२/०९/२०२३ अशी एकूण ०५ दिवसांची वैद्यकीय रजा मंजूर करावी, अशी विनंती करुन सोबत Yashodhara Super Specialty Hospital, Solapur डॉ. प्रितेश अशोक पवार यांच्या स्वाक्षरीचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले आहे.<br>उपरोक्त दोन्हीही अर्ज व रुजू अहवाल अनुषंगिक दस्तऐवजांसहित दि.२५/०९/२०२३ रोजी सादरीकरण करण्यात आले होते. त्यात नमूद करण्यात आले आहे की, विद्यापीठ परिसरातील नियमित पदावर कार्यरत असलेल्या शिक्षकांना लागू असलेले परिनियम क्र. २७२[e(B)(a)&(i)] असाधारण रजा (Extraordinary Leave) नुसार जर एखाद्या नियमित अध्यापकाच्या खाती कोणत्याही प्रकारची रजा शिल्लक नसेल तर वैद्यकीय कारणास्तव वा इतर वैयक्तिक कारणास्तव मा. व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वपरवानगीने असाधारण रजा विनावेतन उपभोगता येऊ शकते अशी तरतूद आहे.<br>संबंधितांच्या अभिलेखावरील मूळ सेवापुस्तिकेचे अवलोकन केले असता, दि.०१/०७/२०२३ ते ३१/१२/२०२३ या कालावधीतील एकूण ११ अर्धवेतनी (परिवर्तित रजा) शिल्लक असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे एकूण ३८ दिवस वैद्यकीय रजा संबंधितांच्या खाती खर्ची टाकणे अशक्य असल्याने डॉ. सौ. माया जगदीश पाटील यांना सदर दोन्हीही अर्जानुसार मागणी केलेली रजा सध्या व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रायोजित नसल्याने मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये दि.२५/०७/२०२३ ते २६/०८/२०२३ आणि दि.२९/०८/२०२३ ते ०२/०९/२०२३ अशी एकूण ३८ दिवस वैद्यकीय कारणास्तव विनावेतन असाधारण रजा (Extraordinary Leave) मंजूर केली आहे. त्यानुसार प्रस्तुत कार्यालयाचे जा.क्र. पुअहोसोविसो / आस्था / शिक्षक / २०२३ / ७१११, दि.३०/०९/२०२३ अन्वये मा. वित्त व लेखाधिकारी यांना उपरोक्त कालावधीतील एकूण ३८ दिवसांचे माहे वेतन कपात करणेबाबत अवगत करण्यात आले आहे.<br>सबब, सदरची बाब माहितीस्तव. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **डॉ. सौ. एम. जे. पाटील सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल यांना विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित शिक्षकांना लागू असलेले परिनियम क्र. २७२ [e(B)(a)&(i)] नुसार ३८ दिवसांची विनावेतन असाधारण रजा (Extraordinary Leave) बाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. प्रभारी कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याकडून विद्यापीठास डोनेशन स्वरुपात देवू केलेले विविध ग्लो मॉडेल्स, ग्लो बोर्डस स्वीकारण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ आरोग्य केंद्राच्या माध्यमातून डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याकडून विद्यापीठास डोनेशन स्वरुपात विविध ऑर्गन ग्लो मॉडेल्स, ग्लो बोर्डस देणगी स्वरुपात देण्याचा प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाला आहे. सदर मॉडेल्स व बोर्डस सोलापूर विज्ञान केंद्र येथे विद्यापीठाच्या माध्यमातून ठेवून तेथे भेट देणाऱ्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शरीर व आरोग्य विषयक माहिती उपलब्ध होवू शकेल असा एक आगळा वेगळा विभाग तयार करता येवू शकेल.<br>सबब, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याकडून विद्यापीठास डोनेशन स्वरुपात देवू केलेले विविध ग्लो मॉडेल्स, ग्लो बोर्डस स्वीकारण्याची बाब विचारार्थ. | आरोग्य केंद्र विभाग |
| ठराव: | **डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याकडून विद्यापीठास डोनेशन स्वरुपात देवू केलेले विविध ग्लो मॉडेल्स, ग्लो बोर्डस विद्यापीठाच्याच एखाद्या संकुलात ठेवण्याच्या अटीच्या अधीन राहून स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १३ ]</td><td>

**दि.१५/९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परीषदेच्या बैठकीतील ठराव क्र. २८ नुसार एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांना २०,००,०००/- (वीस लाख रुपये) अग्रीम (Advance) देण्याची बाब पुनश्च व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ सादर.**

टिपणी: एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांना मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग केंद्र देण्यात आलेले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मानवविज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, आंतरविद्याशाखा इ. अंदाजे तीन लाख पन्नास हजार उत्तरपत्रिका स्कॅन करुन एकत्रित केली जातील आणि उच्च सुरक्षा आणि गोपनीयतेसह संग्रहित केल्या जातील, म्हणून कर्तव्याच्या उददेशाने विनंती केली की, उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क रुपये म्हणून त्यांच्या संस्थेला प्रति उत्तरपत्रिका ५.५/- रुपये शुल्क मंजूर करावे. तसेच एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांनी त्यांच्या जा. क्र. NBNSCOE/ २०२३-२४/१४१ दि.०४/०८/२०२३ व जा. क्र. NBNSCOE /२०२३-२४/General/१५२, दि.१९/८/२०२३ अन्वये तातडीने २०,००,०००/- (वीस लाख रुपये) Advance/अग्रीमची मागणी एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांनी केलेली होती.

त्यानुसार एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव येथील स्कॅनिंग केंद्रासाठी तातडीने २०,००,०००/- (रुपये वीस लाख) Advance/अग्रीमची मागणी केल्याची बाब दिनांक १५/९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ सादर केला असता सदर बैठकीत खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

<table>
<tr><td>ठराव</td><td>एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव येथील स्कॅनिंग केंद्रासाठी त्यांच्या जा.क्र. NBNSCOE/२०२३-२४/१४१ दि.०४/०८/२०२३ व जा. क्र. NBNSCOE/२०२३-२४/ General /१५२ दि.१९/८/२०२३ अन्वये तातडीने २०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त) अग्रीम (Advance) देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
</table>

व्यवस्थापन परीषदेच्या उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांना २०,००,०००/- (रुपये वीस लाख) अग्रीम (Advance) देण्याबाबत टिपणी सादर करण्यात आलेली होती. सबब एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांना २०,००,०००/- (रुपये वीस लाख) अग्रीम (Advance) देण्याबाबतच्या टिपणीवरील मा. कुलगुरु महोदय यांच्या शेऱ्यानुसार सदरची बाब पुनश्च व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ सादर.

</td><td>परीक्षा व मूल्यमापन विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**दि.१५/९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परीषदेच्या बैठकीतील ठराव क्र. २८ नुसार एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव या उत्तरपत्रिका स्कॅनिंग केंद्रास प्रक्रिया शुल्क म्हणून अग्रीम (Advance) देण्याऐवजी संपूर्ण प्रक्रिया शुल्क देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

</td><td></td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १४ ]</td><td>ऑनस्क्रीन मूल्यमापनासाठी आवश्यक असलेले Infrastructure प्रस्तुत विद्यापीठाच्या नवीन इमारतीमध्ये सुरु करण्याच्या दृष्टीने समिती गठीत करण्यासाठी दोन व्यवस्थापन परीषदेचे सदस्य यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेचे निकाल प्रसिध्द करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने व ऑक्टोंबर / नोव्हेंबर २०२३ च्या परीक्षेचे नियोजन करण्याच्या दृष्टीने मा. प्र. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षा व मूल्यमापन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची बैठक दि.३०/९/२०२३ रोजी दुपारी ०४:३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये ठराव क्र. ०६ नुसार खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.
<table><tr><td>ठराव क्र. ६</td><td>ऑनस्क्रीन मूल्यमापनासाठी आवश्यक असलेले Infrastructure प्रस्तुत विद्यापीठाच्या नवीन इमारतीमध्ये सुरु करण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन परीषदेकडून ५ सदस्यीय समिती गठीत करावी. त्यामध्ये प्रथम दोन सदस्य व्यवस्थापन परीषदेने नामनिर्देशित केलेले असावे व उर्वरित तीन सदस्य प्रा. आर. एस. मेंते, डॉ. म.स. रोकडे, प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, श्री. जी. ए. कुलकर्णी हे असतील.</td></tr></table>
उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने ऑनस्क्रीन मूल्यमापनासाठी आवश्यक असलेले Infrastructure प्रस्तुत विद्यापीठाच्या नवीन इमारतीमध्ये सुरु करण्याच्या दृष्टीने समिती गठीत करण्यासाठी दोन व्यवस्थापन परीषदेचे सदस्य यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ.</td><td>परीक्षा व मूल्यमापन विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>ऑनस्क्रीन मूल्यमापनासाठी आवश्यक असलेले Infrastructure प्रस्तुत विद्यापीठाच्या नवीन इमारतीमध्ये परिपूर्ण नसल्याने, सद्यस्थितीत पूर्वीच्या ठिकाणी म्हणजेच एन.बी.नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर येथे त्याच अटी/शर्तीसह स्कॅनिंग केंद्र ठेवण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १५ ]</td><td>SHPC Technologies Pvt. Ltd. या फर्मचे मार्च/एप्रिल, २०२३ च्या परीक्षेच्या DTP Type Setting per page and E-secure Remote Paper Delivery या कामाचे देयक अदा करण्याची बाब फेर विचारार्थ.<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या माहे, मार्च/एप्रिल, २०२३ च्या परीक्षा १९ जून, २०२३ पासून नियोजित वेळापत्रकानुसार संपन्न झालेल्या आहेत. सदर परीक्षेच्या पश्नपत्रिका डी. टी. पी. करणे, (SRPD) परीक्षा केंद्रावर ऑनलाईन प्रश्नपत्रिका पाठविण्याचे काम SHPC Technologies Pvt. Ltd. या गोपनीय फर्मला देण्यात आलेले आहे. सदरचे काम उक्त गोपनीय फर्मनी यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. त्यानुसार सदर फर्मचे देयक या कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्या देयकाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.<br>
<table>
<tr><th>Invoice Date</th><th>Invoice Number</th><th>Total No. of Pages</th><th>Amount</th><th>CGST/SGST (09 % + 09%)</th><th>Total Amount</th></tr>
<tr><td>10/08/2023</td><td>SHPC-TECH(1010) 2023-24</td><td>2522</td><td>6,30,500/-</td><td>56745 + 56745</td><td>7,43,990/-</td></tr>
<tr><td>10/08/2023</td><td>SHPC-TECH (1011) 2023-24</td><td>2740</td><td>6,85,000/-</td><td>61650 + 61650</td><td>8,08,300/-</td></tr>
<tr><td>10/08/2023</td><td>SHPC-TECH(1012) 2023-24</td><td>7694</td><td>19,23,500/-</td><td>173115 + 173115</td><td>22,69,730/-</td></tr>
<tr><td colspan="5" align="right">Grand Total</td><td>38,22,020/-</td></tr>
</table>
<table>
<tr><th>Invoice Date</th><th>Invoice Number</th><th>Total No. of Pages</th><th>Amount</th><th>CGST/SGST (09 % + 09%)</th><th>Total Amount</th></tr>
<tr><td>06/06/2023</td><td>SHPC-TECH(1002) 2023-24</td><td>321</td><td>1,08,234/-</td><td>8262 + 8262</td><td>1,08,324/-</td></tr>
</table>
<table>
<tr><th>Invoice Date</th><th>Invoice Number</th><th>Total No. of Pages</th><th>Amount</th><th>CGST/SGST (09 % + 09%)</th><th>Total Amount</th></tr>
<tr><td>08/09/2023</td><td>SHPC-TECH(1016) 2023-24</td><td>326</td><td>81,500/-</td><td>7335 + 7335</td><td>81,500/-</td></tr>
<tr><td colspan="5" align="right">Grand Total</td><td>96,170/-</td></tr>
</table>
त्यानुसार या कार्यालयाच्या दि.२१/०८/२०२३ रोजीच्या टिपणीवरील मा. प्र. कुलगुरु यांच्या पृष्ठांकनानुसार मा. प्रभारी कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेनुसार सदर विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवण्यात आला होता. त्यानुसार सदर विषयावर मार्च /एप्रिल २०२३ परीक्षेच्या डी.टी.पी. टाईपसेटिंग आणि प्रश्नपत्रिका ई-डिलेव्हरी या कामाचे देयक आदा करण्याबाबत गठित केलेल्या समितीने संबंधित फर्मला प्रत्यक्ष भेट देऊन खातरजमा करावी व देयक प्रमाणित करावे. आणि तद्नंतर देयक अदा करावे असे सर्वानुमते ठरले.</td><td>परीक्षा व मूल्यमापन विभाग</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | यापूर्वी मा. वित्त व लेखा अधिकारी यांनी दिलेल्या तोंडी सूचनेनुसार मा. वित्त व लेखा अधिकारी समवेत दोन व्यवस्थापन परीषद सदस्य मुंबई येथे गोपनिय प्रेसला भेट देण्यासाठी विद्यापीठ वाहनाने जाणार असल्याचे कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.०१/०७/२०२३ रोजी टिपणीसादर करण्यात आलेली होती. त्यावर मा.प्रभारी कुलगुरु महोदय यांनी व्य.प.सदस्य डॉ. चिलवंत, डॉ. सचिन गायकवाड व वित्त व लेखा अधिकारी यांचे नामनिर्देशन केलेले होते.<br>परंतू व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने उक्त नामनिर्देशित सदस्यांना जाण्याबाबत वेळ व दिनांक विचारला असता दिनांक ०५/१०/२०२३ रोजी सदर गोपनिय प्रेसला भेट देण्यासाठी असमर्थता दर्शविली असल्यामुळे मा. प्रभारी कुलगुरु महोदय यांनी Majority of members expressed their inability to visit MC may please decide the replacement / otherwise असे पृष्ठांकन केले आहे.<br>त्यामुळे सदर गोपनीय प्रेसचे मार्च/एप्रिल २०२३ च्या झालेल्या परीक्षेच्या कामाचे देयक अदा करणे अद्याप प्रलंबित आहे.<br>याबाबत कार्यालयाचे निवेदन असे आहे की, संबंधित गोपनीय फर्मचे कामकाज हे प्रश्नपत्रिका टंकलेखन करणे व गोपनीयरित्या सर्व परीक्षा केंद्रांना नियोजित वेळापत्रकानुसार वितरीत करणे आहे. सदरचे कामकाज हे अचूकरित्या व वेळेत पुर्ण झाले आहे. गोपनीय फर्ममध्ये विद्यापीठाचे कोणतेही अधिकारी /कर्मचारी किंवा विद्यापीठ प्राधिकरणाचे सदस्य किंवा विद्यापीठाशी संबंधित व्यक्तीने भेट देण्यासाठी जाणे म्हणजे गोपनीयतेचा भंग होणे आहे.<br>सबब, मा. प्रभारी कुलगुरु यांचे पृष्ठांकन विचारात घेता SHPC Technologies Pvt. Ltd या गोपनीय फर्मचे मार्च /एप्रिल २०२३ च्या झालेल्या परीक्षेच्या DTP Type setting per page and E-secure Remote paper Delivery या कामाचे देयक अदा करणेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या फेर विचारार्थ सादर. | |
| ठराव: | **समिती सदस्यांच्या निवेदनानुसार समितीची गोपनिय फर्मला भेट रद्द करण्यात येऊन, SHPC Technologies Pvt. Ltd. या फर्मचे मार्च/एप्रिल, २०२३ च्या परीक्षेच्या DTP Type Setting per page and E-secure Remote Paper Delivery या कामाचे देयक अदा करण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १६ ] | दि.१७/१०/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ बैठकीमधील उपसमितीचा अहवाल विचारार्थ.<br>टिपणी: दि.१७/१०/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांना देण्याबाबत मान्यता देण्यात आली. सदर बैठकीमध्ये परीक्षा शुल्क विभागासाठी एक उपसमिती स्थापन करण्यात आली. सदर उपसमितीने दि.१७/१०/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ बैठकीमध्ये सादर केलेला अहवाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्विकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेला अहवाल विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | दि.१७/१०/२०२३ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ बैठकीमधील उपसमितीचा अहवाल स्विकारुन संलग्नित महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांकडे देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. उपसमितीने अहवालामध्ये खालील बाबींचा समावेश करुन परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीसमोर पुनश्च: ठेवण्याचे ठरले.<br>१) परीक्षा शुल्क हिस्सा ६०% विद्यापीठास व ४०% महाविद्यालयास असेल.<br>२) प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका विद्यापीठ उपलब्ध करुन देईल.<br>३) वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक (Sr. Ext. Examiner) विद्यापीठ नियुक्त करील.<br>४) निकाल प्रक्रिया व निकालानंतरची पुर्नपडताळणी पूर्ण होताच महाविद्यालये विद्यापीठाकडे उत्तरपत्रिका परत करतील.<br>५) संलिग्नत महाविद्यालयांकडे परीक्षा घेणे, उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करणे, फोटोकॉपी व पुर्नमूल्यांकन करणे या जबाबदाऱ्या असतील.<br>६) संबंधित महाविद्यालय जवळपासच्या महाविद्यालयामधून मॉडरेटर नेमून उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करुन घेईल. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १७ ] | **दि.१८/१०/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.१८/१०/२०२३ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार दि.१८/१०/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>सबब, दि.१८/१०/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.१८/१०/२०२३ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

डॉ. समाधान दिगंबर पवार यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१८(१)] | **प्रस्तुत विद्यापीठातील अधिविभागात कार्यरत असणाऱ्या कंत्राटी प्राध्यापकांना सेमिनार, विविध प्राधिकरणे यावर सहभागी होण्यासाठी कर्तव्य रजा मिळण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील विविध अधिविभागाअंतर्गत शैक्षणिक वर्षाकरिता नेमलेल्या तात्पुरत्या व कंत्राटी सहायक व सहयोगी प्राध्यापक यांचे विद्यापीठाला बौध्दिक योगदान देत असताना त्यांना सेमिनार, विविध प्राधिकरणे यावर सहभागी होण्यासाठी आपण त्यांना कर्तव्य रजा दिली पाहिजे ही बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठातील अधिविभागात कार्यरत असणाऱ्या कंत्राटी प्राध्यापकांना सेमिनार, विविध प्राधिकरणे यावर सहभागी होण्यासाठी नियमानुसार कर्तव्य रजा देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

डॉ. सुशिल कुमार शिंदे यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१८(२)] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल, २०२३ मध्ये झालेल्या परीक्षा गैरप्रकाराबाबतची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल, २०२३ मध्ये विद्यापीठाच्या परीक्षा संपन्न झाल्या आहेत. या परीक्षेच्या काळात समकक्षता विषयाचे कोड विद्यापीठाकडून सर्व्हिस प्रोव्हायडर कंपनीकडे चुकीचे गेल्याने काही विषयाच्या परीक्षा रद्द करुन पुढे ढकलण्यात आल्या होत्या.<br>सबब, या गैरप्रकाराला जबाबदार असणारा सेवक किंवा अधिकारी यांच्यावर कारवाई करणेबाबत हा विषय प्रमाद समितीसमोर तात्काळ ठेवून संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल, २०२३ च्या परीक्षेच्या काळात समकक्षता विषयाचे कोड विद्यापीठाकडून सर्व्हिस प्रोव्हायडर कंपनीकडे चुकीचे गेल्याने काही विषयाच्या परीक्षा रद्द करुन पुढे ढकलण्यात आल्या होत्या याबाबत वस्तुस्थिती विचारात घेवून कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड व श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१८(३)] | **विद्यापीठ निवड समितीमार्फत ज्या अध्यापकांची दि.१४ जून, २००६ पूर्वी नियुक्ती झालेली असून, त्या अध्यापकांनी दि.०१ जानेवारी, १९९४ ते दि.११ जुलै, २००९ या कालावधीमध्ये एम. फिल. पदवी संपादन केलेल्या अध्यापकांचे प्रस्ताव नेट मधून सूट मिळण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठाने ज्या अध्यापकांची नियुक्ती १४ जून, २००६ पूर्वी झालेली असून त्या अध्यापकांनी १ जानेवारी, १९९४ ते ११ जुलै, २००९ या कालावधीमध्ये एम. फिल. पदवी संपादन केली आहे, अशा सर्व अध्यापकांचे प्रस्ताव, नेटमधून सूट मिळणेसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्यासाठी मागविले आहेत. या सर्व प्रस्तावांची छाननी विद्यापीठ स्तरावर पूर्ण झाली आहे.<br>सबब, विद्यापीठ निवड समितीमार्फत ज्या अध्यापकांची दि.१४ जून, २००६ पूर्वी नियुक्ती झालेली असून, त्या अध्यापकांनी दि.०१ जानेवारी, १९९४ ते दि.११ जुलै, २००९ या कालावधीमध्ये एम. फिल. पदवी संपादन केलेल्या अध्यापकांचे प्रस्ताव नेट मधून सूट मिळण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्याची बाब विचारार्थ. | शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ निवड समितीमार्फत ज्या अध्यापकांची दि.१४ जून, २००६ पूर्वी नियुक्ती झालेली असून, त्या अध्यापकांनी दि.०१ जानेवारी, १९९४ ते दि.११ जुलै, २००९ या कालावधीमध्ये एम. फिल. पदवी संपादन केलेल्या अध्यापकांचे नेट मधून सूट मिळण्यासाठी प्राप्त झालेले प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्याची बाब प्रशासकीय असल्याने त्याची नोंद घेण्यात आली.** | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद